# पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण

पोलीस मुख्यालय आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० - E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांक:- ०७/०९/२०१८

## गणेश मंडळांना आता ऑनलाईन परवाने - नाशिक ग्रामीण पोलीसांचा निर्णय, घरबसल्या नोंदणी करण्याची मंडळांना संधी

---

गणेश मंडळांना पोलीसांकडुन मिळणा-या परवान्यासाठी पोलीस स्टेशनमध्ये चकरा मारण्याची आणि रांगेत थांबण्याची आता गरज नाही. नाशिक ग्रामीण पोलीसांनी यातुन गणेश मंडाळांच्या कार्यकर्त्यांची सुटका करत जिल्हयातील सर्व गणेश मंडळांना प्रथमच ऑनलाईन पध्दतीने परवाना देण्याची सुविधा सुरु केली आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांना दिलासा मिळाला आहे.

गणेशोत्सवाला अवघे काही दिवस शिल्लक राहिले आहेत. त्यामुळे जागोजागी गणेश मंडळांची आणि कार्यकर्त्यांची पुर्वतयारी सुरू आहे. वेगवेगळे परवाने घेण्यासाठी मंडळांच्या कार्यकर्त्यांना वारंवार चकरा माराव्या लागतात. त्यात बराच वेळही जातो, हे लक्षात घेवुन महाराष्ट्र पोलीसांनी यंदा प्रथमच ऑनलाईन पध्दतीने परवाना देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे घरबसल्या आपल्या मोबाईलवरून किंवा घरातील लॅपटॉप-संगणकावरून नोंदवणी करून पोलीस परवाना मिळवता येऊ शकतो, अशी माहिती **नाशिक जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांनी दिली आहे.

**याकडे लक्ष द्या -** परवान्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्यासाठी महाराष्ट्र पोलीसांच्या संकेतस्थळावर (www.mhpolice.maharashtra.gov.in/Citizen/MH/Index.aspx) गेल्यानंतर गणेश मंडळांची नोंदणी हे ऑप्शन दिसेल, त्यावर किंवा थेट सिटीझन पोर्टलवर जाऊन लॉग-इन आयडी व पासवर्ड तयार करायचा. त्यानंतर मंडळाची माहिती विचारणारा फॉर्म समोर येईल, त्यात मंडळाच्या स्थापनेपासुन विसर्जन मिरवणुकीच्या नियोजनापर्यंतची माहिती भरायची आहे. महापालिका, महावितरण यांच्यासह इतर आवश्यक परवाने घेतले असल्यास ते लगेच अपलोड करायचे आहेत, त्यानंतर अर्ज सबमिट करायचा. त्यानुसार तो त्या-त्या भागातील पोलीस स्टेशनमधील अधिका-यांना पहायला मिळेल. ऑनलाईन पध्दतीने मिळालेल्या कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर पोलीसांकडुन लगेचच कार्यकर्त्यांच्या ई-मेलवर परवाना पाठवला जाणार आहे त्यामुळे सदर परवाना यंदा पेपरलेस झाला आहे.

**ऑफलाईन पध्दत पुर्णपणे बंद -** ऑनलाईन पध्दतीने ज्यांना घरबसल्या अर्ज भरता येणार नाही. अशांनी आपल्या भागातील पोलीस स्टेशनमध्ये जायचे आहे. तेथेही ऑनलाईन पध्दतीनेच अर्ज भरायचा आहे. तो अर्ज कसा भरायचा, याचे मार्गदर्शन पोलीस अधिकारी-कर्मचारी करणार आहे. त्यामुळे पोलीस स्टेशनमध्ये बसुन मोबाईलवरूनही कार्यकर्त्यांना अर्ज भरता येणार आहे. हेही शक्य झाले नाही तर शेवटी पोलीस स्वत-ऑनलाईन अर्ज भरून देणार आहे. ऑफलाईन पध्दत यंदा पुर्णपणे बंद करण्यात आली आहे. सिटीझन पोर्टलबाबतचे प्रशिक्षण पोलीस अधिकारी - कर्मचा-यांना देण्यात आले असल्याची माहिती पोलीस प्रमुखांनी दिली आहे. नाशिक ग्रामीण जिल्हयात गतवर्षात एकगाव एक गणपती/अधिकृत गणेश मंडळांची एकुण संख्या २९८५ होती. वरील माहितीप्रमाणे मंडळांनी आप-आपले ऑनलाईन परवाने आचज काढुन घ्यावे असे आवाहन नाशिक ग्रामीण पोलीस दलातर्फे करण्यात आले आहे.